**ठळक बातम्या**

- देश विदेशात शिवजयंती उत्साहात साजरी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना लवकरच युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळणार असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्याकडून व्यक्त

- मुख्यमंत्री निवडीसाठी दिल्ली विधानसभेतल्या भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक

- म्हैसूर शहर विकास प्राधिकरणाच्या जमीन वाटप प्रकरणी पुरावे नसल्यानं घोटाळा झाला असल्याचं सिद्ध होत नसल्याचा लोकायुक्त पोलिसांचा अहवाल

**आणि**

- नवव्या आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेला आजपासून कराचीमध्ये सुरूवात

**<><><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं आहे. शिवाजी महाराज यांच्या कार्यातून एक बलशाली, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी प्रेरणा मिळत असल्याची भावना त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून व्यक्त केली आहे.

संसद भवन परिसरातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास विविध मान्यवरांसह शिवप्रेमींकडून अभिवादन करण्यात आलं. नवीदिल्लीत महाराष्ट्र सदनात शिवजयंती सोहळा झाला. भारतीय लष्करानं यावेळी छत्रपती

शिवाजी महाराजांना प्रथमच विशेष मानवंदना दिली. आग्रा किल्ल्यावरही आज विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

राज्यपाल सी. पी राधाकृष्णन यांनी मुंबईत शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा दर्जासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नामांकित केले आहेत, त्यांना लवकरच मंजुरी मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला. पुण्यात आज जय शिवाजी जय भारत पदयात्रेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. शिवरायांची जयंती फक्त भारतातच नाही तर २० देशांमध्ये साजरी केली जाते. त्यांचं प्रशासन, कल्याणकारी धोरणं, संरक्षण आणि नौदलाचं व्यवस्थापन, दूरदर्शी नेतृत्व हे अतुलनीय असल्याचं ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी एका मजबूत आणि स्वयंपूर्ण राष्ट्राची कल्पना केली होती, त्याचप्रमाणे आजच्या तरुणांनी नवोन्मेष, सामाजिक सौहार्द आणि समावेशक विकासासाठी काम केलं पाहिजे असं केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय म्हणाले. राज्यभरात प्रत्येक जिल्ह्यात ‘जय शिवाजी - जय भारत’ पदयात्रे आयोजित करण्यात आली होती. उच्च पदस्थ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि युवावर्ग मोठ्या संख्येनं त्यात सहभागी झाले होते.

**<><><><><>**

अमेरिकेत न्यूयॉर्कमध्येही छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अमेरिकेच्या विविध राज्यातून आलेले नागरिक यात सहभागी झाले होते. याविषयी सांगली जिल्ह्यातल्या शिराळ्याचे मूळ रहिवासी

आणि सध्या अमेरिकेत कार्यरत असलेले डॉ. युनूस आत्तार आकाशवाणीला अधिक माहिती दिली.

**होल्ड अमेरिका - युनूस आत्तार**

**<><><><><>**

दिल्लीत होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्तानं पहिल्यांदाच पुणे ते दिल्ली रेल्वे प्रवासादरम्यान ‘मराठी साहित्ययात्री संमेलन’ आयोजित केलं आहे. या विशेष रेल्वेला महादजी शिंदे यांचं नाव दिलं आहे, तर रेल्वे बोग्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांची नावं दिली आहेत.

या संमेलनाचा प्रारंभ आज पुणे रेल्वे स्थानकावर झाला. मराठी साहित्ययात्री संमेलनाचे अध्यक्ष शरद तांदळे, कार्यकारी अध्यक्ष वैभव वाघ,  आदी मान्यवर उपस्थित होते. ‘गर्जा महाराष्ट्र माझा’ या महाराष्ट्र गीताच्या सामूहिक गायनानंतर पुण्यातून रेल्वे निघाली. तत्पूर्वी पुस्तक दिंडीही काढली होती. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी देखील या विशेष रेल्वेद्वारे साहित्यिकांसोबत प्रवास केला.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभेतल्या भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक सध्या नवी दिल्लीत सुरू आहे. पक्षाचे नवनिर्वाचित आमदार आणि वरिष्ठ नेते यात सहभागी झाले आहेत. भाजपानं ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद आणि ओ. पी. धनखड यांना या प्रक्रीयेसाठी पर्यवेक्षक नेमलं आहे. दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्याचं नाव या बैठकीतच निश्चित होईल, नव्या मुख्यमंत्र्याचा शपथविधी सोहळा उद्या रामलीला मैदानावर होणार आहे.

**<><><><><>**

मुडा अर्थात म्हैसूर शहर विकास प्राधिकरणाच्या जमीन वाटप प्रकरणी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, त्यांच्या पत्नी पार्वती आणि इतरांविरोधात पुरेसे पुराव नाहीत. त्यामुळं घोटाळा झाल्याचं सिद्ध करता येत नसल्याचं कर्नाटकातल्या लोकायुक्त पोलिसांनी म्हटलं आहे. याप्रकरणी चौकशीचा अंतरिम अहवाल त्यांनी उच्च न्यायालयात सादर केला. अंतरिम अहवाल सादर केला तरी चौकशी सुरूच राहणार आहे. सक्तवसुली संचलनालयही याप्रकरणाची चौकशी करत आहे.

**<><><><><>**

रेल्वेच्या विभागीय परीक्षांशी संबंधित घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागानं पश्चिम रेल्वेच्या पाच अधिकाऱ्यांना अटक केली. बडोदा आणि अमदाबादमधून प्रत्येकी २ आणि मुंबईत एकाला अटक झाली आहे. रेल्वेच्या कार्मिक विभागातील दोघा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा त्यात समावेश आहे. परीक्षार्थींकडून लाच घेतल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. याप्रकरणी सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी बडोद्यात ११ ठिकाणी छापे घातले. त्यात ६५० ग्रॅम सोने आणि ५ लाख रुपये रोख रक्कम ताब्यात घेतल्याची माहिती प्रवक्त्यानं दिली.

**<><><><><>**

मध्यप्रदेशातल्या बालाघाट जिल्ह्यात पोलिसांसोबत आज झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. छत्तीसगडच्या सीमेवर ही चकमक झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. यात काही नक्षलवादी जखमी झाले, मात्र ते पळ काढण्यात यशस्वी झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. घटनास्थळावरून पोलिसांनी शस्त्रास्त्र जप्त केली आहेत.

**<><><><><>**

वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडियो व्हिझ्युअल अँड एंटरटेनमेंट समिटमधे ईडीएम अर्थात इलेक्ट्रॉनिक डान्स म्युझिक महत्वाची भूमिका पार पाडण्यासाठी सज्ज आहे. यात इलेक्ट्रॉनिक डान्स म्युझिकमधील जागतिक प्रतिभा एकत्र आणल्या जातील. संगीताची निर्मिती आणि लाईव्ह परफॉर्मन्समधे नाविन्यपूर्णता, सर्जनशीलता आणणं हा याचा हेतू आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या सहाय्याने भारतीय संगीत उद्योगानं याचं आयोजन केलं आहे. हा उपक्रम क्रिएट इन इंडियाचा भाग आहे. प्रसारण आणि इन्फोटेनमेंट, डिजिटल माध्यमं आणि नवोन्मेष, चित्रपट आणि AVGC XR या चार पायांवर व्हेव्हज आधारलेलं आहे. ईडीएम हे प्रसारण आणि इन्फोटेनमेंट विभागाचा एक भाग आहे.

**<><><><><>**

भारताचं राष्ट्रीय तांत्रिक वस्त्रोद्योग अभियान प्रगत कापड उत्पादनासह वस्त्रोद्योगात क्रांती घडवेल, असा विश्वास अभियानाचे संचालक अशोक मल्होत्रा यांनी आज व्यक्त केला. भिवानी इथे टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्सटाईल्स अँड सायन्सेस संस्थेत आयोजित राष्ट्रीय वस्त्रोद्योग परिषदेला ते संबोधित करत होते. या उत्पादनासाठी दीड हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आल्याचं मल्होत्रा यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

नवव्या आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज कराची इथं सुरु असलेल्या सलामीच्या सामन्यात न्यूझीलंडनं पाकिस्तानपुढं विजयासाठी ३२१ धावांचं आव्हान ठेवलं आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचाचा निर्णय घेतला. न्यूझीलंडनं निर्धारित ५० षटकात ५ गड्यांच्या

मोबदल्यात ३२० धावा केल्या. टॉम लॅथमनं नाबाद ११८, तर विल यंगनं १०७ धावा केल्या. ग्लेन पिलिप्सनं ६१ धावांचं योगदान दिलं. पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. शेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या १४ षटकात २ बाद ४१ धावा झाल्या होत्या. चॅम्पियन्स करंडक स्पर्धेतले सामने पाकिस्तान आणि दुबईत होणार आहेत. रोहीत शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाचा पहिला सामना उद्या दुबईत बांगलादेशविरुद्ध होणार आहे.

<><><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत, नागपूर इथं सुरू असलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात विदर्भानं दुसऱ्या डावात आज दिवसअखेर ४ बाद १४७ धावा करत, मुंबईवर २६० धावांची आघाडी घेतली.

मुंबईचा पहिला डाव आज २७० धावांवर आटोपला. आकाश आनंदनं शतक झळकावत १०६ धावा केल्या. विदर्भातर्फे पार्थ रेखाडेनं ४ बळी घेतले. दुसऱ्या डावात, विदर्भाची सुरुवात खराब झाली. त्यांचे ४ गडी झटपट बाद झाले. मात्र त्यानंतर यश राठोड आणि कर्णधार अक्षय वाडकर यांनी डाव सावरला. आजचा खेळ थांबला तेव्हा यश राठोड ५९, तर अक्षय वाडकर ३१ धावांवर खेळत होता.

अहमदाबाद इथं गुजरात आणि केरळ यांच्यात सुरु असलेल्या, पहिल्या उपांत्य सामन्यात केरळनं पहिल्या डावात ४५७ धावा केल्या. महंमद अजहरुद्दीनच्या नाबाद १७७ धावांचा त्यात मोठा वाटा आहे. गुजरातनं पहिल्या डावात दिवसअखेर १ बाद २२२ धावा केल्या. प्रियांक पांचाल आणि आर्य देसाई यांनी पहिल्या गड्यासाठी १३१ धावांची भागीदारी केली. आर्य देसाई ७३ धावांवर

बाद झाला. प्रियांक पांचालनं शतक झळकावलं. आजचा खेळ थांबला तेव्हा तो ११७ धावांवर, तर मनन हिंग्राजिया ३० धावांवर खेळत होता.

**<><><><><><>**

महिलांच्या प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज बडोदा इथं दिल्ली कॅपिटल्स आणि यूपी वॉरियर्स यांच्यात सामना सुरू आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा यूपी वॉरियर्सच्या ८ षटकात २ बाद ७५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><><>**

आत्ताच हाती आलेल्या बातमीनुसार भाजपाच्या रेखा गुप्ता दिल्लीचे नवे मुख्यमंत्री असतील. भाजपा विधिमंडळ पक्षाच्या आज झालेल्या बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं.

**//<><><><><><>//**